पशुसंगोपन

# जनावरांचे दैनंदिन आरोग्य; व्यवस्थापन आणि देखभाल



डॉ. शिल्पा मोडेकर साळुंके
(मो.नं. ७४००३५८८९८)
सहायक प्राध्यापिका
शरीररचनाशास्त्र विभाग,
क्रांतिवीर नानासाहेब पाटील
पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ, जि. सातारा



> आपण आपल्या जनावरांकडे दिवसभरातून एका ठरावीक वेळी एक चक्कर नक्की मारावी. जेणेकरून आपल्याला गोठ्यातील जनावरे व्यवस्थित आहेत का, एखाद्या जनावराच्या हालचालीमध्ये काही फरक जाणवत आहे का, जनावराच्या अंगावर काही जखमा दिसत आहेत का ते लक्षात येईल आणि वेळीच त्यापरत्वे औषधोपचार करू शकू.

सद्य:परिस्थितीत वातावरणातील चढउतार शेतीत होणारे नुकसान आणि यामुळे आपल्या शेतकरी बांधवांची होणारी आर्थिक कुचंबणा, शब्दांत मांडणे खरंच अशक्यप्राय गोष्ट आहे. पण हे सर्व अनुभवताना आपल्याला एका गोष्टीकडे अजिबात दुर्लक्ष करता येणार नाही आणि ती गोष्ट म्हणजे; शेतीला पूरक व्यवसाय म्हणून गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून आपले शेतकरी बंधू दुग्ध व्यवसाय हाच सर्वोत्तम जोडधंदा म्हणून अंगिकारत आहेत. बऱ्याच जणांनी तर दुग्धव्यवसाय हाच आपला व्यवसाय म्हणून अंगिकारला आहे. पण व्यवसाय सुरू केला, योग्य व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देखील घेतलेले असेल, तरीही त्यात काही महत्त्वाच्या बाबी अशा आहेत की ज्या प्रत्येक गोपालकाला माहीत असावयास हव्यात. प्रामुख्याने दैनंदिन व्यवस्थापनातल्या तपासण्या आणि हवामानातील बदलांप्रमाणे आपल्या जनावरांची देखभाल या त्या गोष्टी होत.

आपल्या जनावरांकडून चांगल्या प्रतीचे आणि भरघोस उत्पन्न मिळावे याकरिता योग्य आहार, वेळोवेळी विविध रोगांचा अटकाव करण्याहेतू करावयाचे लसीकरण आवश्यक आहे. उन्हाळा, पावसाळा किंवा हिवाळा या ऋतुंतील बदलांप्रमाणे जनावरांच्या दैनंदिन व्यवस्थापनात खूप महत्त्वाच्या गोष्टी येतात, त्यांचा विसर न पडता आपण त्या कशाप्रकारे अंगिकारू शकतो ते आपल्याला समजून घ्यावे लागेल.

**दैनंदिन देखभाल** : आपण मानव जसे सवयीचे गुलाम असतो, तसेच आपण आपल्या जनावरांना ज्या सवयी, सुरुवातीपासून लावतो, त्याचप्रमाणे ते वागत असतात. तेव्हा



आपण आपल्या जनावरांच्या गोठ्यांच्या स्वच्छतेची वेळ, जनावरांना चारा/ वैरण देण्याची वेळ, पाणी पाजण्याची वेळ ही नियमित करून घ्यावी आणि ती नेहमी व्यवस्थित पाळावी. असे केल्याने आपल्याला जनावरांच्या आरोग्यावर



आणि एकूणच उत्पादन क्षमतेवर चांगला प्रभाव पडत असल्याचे जाणवेल.

**जनावरांचे दैनंदिन निरीक्षण/ परीक्षण** : आपण आपल्या जनावरांकडे दिवसभरातून एका ठरावीक वेळी एक चक्कर नक्की मारावी. जेणेकरून आपल्याला गोठ्यातील जनावरे व्यवस्थित आहेत का, एखाद्या जनावराच्या हालचालीमध्ये काही फरक जाणवत आहे का, जनावराच्या अंगावर काही जखमा दिसत आहेत का ते लक्षात येईल आणि वेळीच त्यापरत्वे औषधोपचार करू शकू. त्याचप्रमाणे त्यांना दिलेला चारा, पेंड इत्यादीचा व्यवस्थित आहार ती घेत आहेत का, त्याचे पण निरीक्षण करावे. जनावरांच्या कासेवर सूज/ गाठी तर नाहीत ना हे देखील पहावे. याद्वारे गोठ्याच्या स्वच्छतेची पण शहानिशा होईल आणि जनावराच्या शरीरावर/ व्यवहारावर काही फरक जाणवल्यास लागलीच उपाययोजना करून औषधोपचार पण करता येईल.

**जनावरांच्या दैनंदिनीत अंगिकारायच्या गोष्टी** : गाय-म्हैस किंवा गोठ्यातील इतरही जनावरांना नियमितपणे खरारा करावा. खरारा करण्याचे खूप फायदे आहेत. त्यातील आत्यंतिक महत्त्वाचा फायदा म्हणजे खरारा केल्याने त्यांच्या शरीरातील रक्तपुरवठा चांगला होतो. जनावराची कांती/ कातडी स्वच्छ होते. कारण खरारा केल्यामुळे त्यांच्या अंगावरील गळालेले केस, मृत पेशींचा थर तसेच धूळ/ घाण निघून जाते. याचप्रमाणे दुग्धोत्पादनासाठी संगोपन केलेल्या जनावरांच्या कासेची याद्वारे स्वच्छता होऊन त्या ठिकाणी गोचिड/ माश्यांना अटकाव केला जाईल आणि स्वच्छ दूधनिर्मिती होईल. खरारा करण्यासाठी आपण दात घासण्याचा मऊ ब्रश अथवा पोत्याची गोणी अंग पुसण्याकरिता वापरू शकतो.

**दूध काढताना घ्यावयाची काळजी** : दूध काढण्यापूर्वी गोठ्याची स्वच्छता केलेली असावी. दूध काढण्याची वेळ

ठरावीक ठेवावी. दूध काढणाऱ्या व्यक्तीचे हात स्वच्छ असावेत, नखे वाढलेली नसावीत. त्याचप्रमाणे ज्या गायी- म्हशी गाभण आहेत अशांची कास रोज चोळावी, जेणेकरून कासेची वाढ चांगली होते. तसेच वेळोवेळी बाह्य परोपजीवी आणि पोटातील परोपजीवी यांचा नायनाट पशुवैद्यकाच्या सल्ल्याने करून घ्यावा.

**वेळोवेळी आरोग्य तपासणीचे महत्त्व** : यात प्रामुख्याने फक्त जनावरांचेच नाही तर गोठ्याचे निर्जंतुकीकरण देखील येते. आपण आपल्या जनावरांचा गोठा २ ते ३ महिन्यांतून एकदा औषधे वापरून, निर्जंतुकीकरण करून घ्यावा. पावसाळ्यात विशेष काळजी घ्यावी. गोठा स्वच्छ राहील याचा पुरेपूर प्रयत्न करावा.

त्याचप्रमाणे आपल्या जनावरांच्या आरोग्याची तपासणी वेळोवेळी करावी. याकरिता पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा. यात प्रामुख्याने जनावरांचा विविध जिवाणुजन्य आणि विषाणुजन्य आजारांपासून बचाव करण्याकरिता वार्षिक- द्विवार्षिक लसीकरण करून घ्यावे. ज्यात प्रामुख्याने बुळकांडी, लाळ्या-खुरकत यासारखे विषाणुजन्य रोग आणि घटसर्प, फऱ्या, अॅन्थ्रॅक्स ब्रुसिलोसिससारख्या विषाणुजन्य आजारांपासून संरक्षण करता येईल. चार- सहा महिन्यांतून किमान एकदा पशुवैद्यकाकडून जनावरे तपासून घ्यावीत. जी जनावरे रोगी आहेत हे निदर्शनास येईल, त्यांना विलगीकरण करून योग्य ते औषधोपचार करून घ्यावेत जेणेकरून बाधित जनावरांचा आजार/ रोग इतर निरोगी जनावरांमध्ये पसरणार नाही. आजारांपासून अटकावाकरिता लसीकरणास अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याचबरोबर जे वळू पैदाशीकरिता वापरले जात आहेत. त्यांच्या खुराकाची योग्य काळजी घेऊन ते रोगमुक्त कसे राहतील याबाबत लक्ष द्यावे.

**गाभण, माजावरील व भाकड जनावरांचे संगोपन** : पशुपालकांनी एक गोष्ट लक्षात ठेवणे आत्यंतिक महत्त्वाचे आहे आणि ते म्हणजे आपल्या गायी- म्हशींचा माज वेळेवर



ओळखून त्यांना योग्य वेळी योग्य वळूमार्फत किंवा कृत्रिम रेतनाद्वारे भरून घ्यावे. योग्य वेळी माज ओळखून जनावर भरून घेतल्यास आर्थिक नुकसान टळेल. गाभण जनावराची योग्य काळजी घ्यावी. वळूमार्फत किंवा कृत्रिम रेतनाद्वारे भरून घेतलेली गाय- म्हैस असेल तिला दीड महिन्यांनंतर



पशुवैद्यकाकडून तपासून घेऊन, गाभण राहिल्याची खात्री करून डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य आहार, लसीकरण द्यावे. म्हणूनच गाय- म्हैस विण्यापूर्वीचा भाकडकाळ किती दिवसांचा असावा हे ठरविणे महत्त्वाचे असते. गाय- म्हैस विण्यापूर्वी त्या सशक्त असण्याकरिता लवकर आटवाव्यात. चांगले व्यवस्थापन, चांगला आहार देऊन संगोपिलेल्या गायी- म्हशी ४० ते ८० दिवस आटविल्या पाहिजेत. चांगले किंवा जास्त दुग्धोत्पादन असणाऱ्या गायी- म्हशींचा भाकडकाळ जास्त ठेवावा. याउलट जी जनावरे कमी दूध देतात त्यांचा भाकडकाळ कमी असावा.

**निरुपयोगी जनावरांची विक्री** : पशुपालकांनी प्रामुख्याने अशी जनावरे कळपापासून वेगळी करावी अथवा विक्री करावीत. उपचार न होऊ शकणाऱ्या व्याधींनी त्रस्त, शारीरिक वाढ योग्यरित्या न झालेली जनावरे, वारंवार उलटणारी जनावरे, दूध कमी देणारी पण भाकडकाळ जास्त असणारी जनावरे विक्री केल्यास फायद्याचे ठरेल.

अशा प्रकारे योग्य नियोजन/ व्यवस्थापनात, खूप क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टी पण किती महत्त्वाच्या असतात आणि त्यावरच उत्पादनाचा नफा- ताटा कसा अवलंबून असतो ते आपण पाहिले. तेव्हा छोट्या वाटणाऱ्या पण महत्त्वाच्या बाबी आपल्या सर्व पशुपालकांना माहीत असणे खूपच गरजेचे आहे. ■